माळणी गावात ३० जुलैला झालेली दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आहे.
त्यातील सर्व मृतांना श्रद्धांजली.

---

मातीचीया माझे, गुण लाख मातृत्वाचे
पाण्यासवे इथे, जीव अंकुर रुजण्याचे

वाढले अंकुर, तिच्या माय कुशीमध्ये
नाचले हासले, सवे वाऱ्या पाण्यासंगे

कालही असेच, सारे कुशीत निजले
घात केला मारा, बेभान वाऱ्या पावसाने

झुंजला डोंगर परी, शेवटी बळ गेले
देह आडवा तयाचा, दु:ख गावावरी पसरले

मायबाप निसर्गा, तुझ्या मायेत वाढले
चूक काय झाली? तुला सांगावेसे ना वाटले !

नियती चाल करी, तुझा काय दोष?
तुझ्या ओंजळी राहिले, त्यांचा तरी काय दोष?

मातीच्या कुशीत, हासरे गाव हरवले
मातीत रुजले, अन मातीतच कोंदले

---

आपल्यापरीने आपण मदत पोहोचवायचा प्रयत्न करूयात.

- सचिन पु. कुलकर्णी
- www.saarthbodh.com